# मा. उप मुख्यमंत्री (वित्त) श्री. अजित पवार यांनी शुक्रवार, दिनांक ११ मार्च २०२२ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

**(अ) राज्यकर विभागाची "महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क थकबाकी तडजोड-२०२२" ही अभय योजना प्रस्तावित :—**

- सदर अभय योजना ही वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी विक्रीकर विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध करांवरील सवलती संदर्भात प्रस्तावित.
- या योजनेचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२.
- विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये रुपये १०,००० पर्यंत थकबाकीची रक्कम असल्यास, सदर थकबाकीची रक्कम माफ होईल. याचा लाभ जवळपास १ लाख प्रकरणांत लहान व्यापाऱ्यांना होईल.
- ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशान्वये थकबाकीची रक्कम दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी रुपये १० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यापाऱ्यांना एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. याचा लाभ जवळपास २ लाख २० हजार प्रकरणांत मध्यम व्यापाऱ्यांना होईल.

**(आ) नैसर्गिक वायुवरील मूल्यवर्धित करात सवलत :—**

- पर्यावरण पूरक असणाऱ्या नैसर्गिक वायुच्या वापरास प्रोत्साहन देण्याकरिता व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी नैसर्गिक वायू वरील मूल्यवर्धित कराचा दर हा १३.५ टक्के वरुन कमी करून ३ टक्के प्रस्तावित.

**(इ) मुद्रांक शुल्कात कर सवलत :—**

(१) बांधकाम व्यवसायाला चालना देण्याकरिता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद ५ (g-a) (ii) च्या परंतुकानुसार विहित करण्यात आलेला सदरचा कालावधी एक वर्षाऐवजी तीन वर्ष करणे प्रस्तावित.

(२) राज्य सरकारच्या अधिपत्याखालील महामंडळे, संस्था यांना जनहितार्थ विना मोबदला बक्षीसपत्राद्वारे देण्यात येणाऱ्या मिळकतींवरील मुद्रांक शुल्क माफी प्रस्तावित.

(३) मुद्रांक शुल्कावरील दंडाच्या प्रलंबित रकमेबाबत राज्यात दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत दंडसवलत अभय योजना प्रस्तावित.

(४) महाराष्ट्र राज्यामध्ये आयात होणाऱ्या सोने-चांदीच्या डिलिव्हरी ऑर्डरच्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार आकारणी करण्यात येणारे सध्याचे ०.१ टक्के मुद्रांक शुल्क माफ करण्याचे प्रस्तावित.

**(ई) राज्याच्या जलवाहतुकीस चालना देण्यासाठी करमाफी :—**

राज्यात जलवाहतुकीस चालना देण्यासाठी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारितील हद्दीत १ जानेवारी, २०२२ पासून नव्याने सुरु होणाऱ्या जलमार्गांवरील चालणाऱ्या फेरीबोट, रो-रो बोटी यामधून प्रवास करणारे प्रवासी, पाळीव प्राणी, वाहने, माल इत्यादींवर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून आकारण्यात येणाऱ्या करास पुढील ३ वर्षांसाठी सुट देण्यात येत आहे.

* * * * *